# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

**पेट्रोलियम एम्प्लॉयीस युनियनच च्या मागण्यांना आणि लढ्याला यशाची पायरी !!!**

आपल्या सुरक्षिततेशी आणि कामाच्या मूलभूत हक्कांशी थेट संबंधित असलेल्या प्रश्नांवर पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन सातत्याने, ठामपणे आणि संघटित पद्धतीने लढा देत आहे याचे आपण सर्व साक्षीदार आहोत. PPE पुरवठा, सेफ्टी शूज, डंगरीज, फायर-रेजिस्टंट कव्हरऑल्स, अन्नपुरवठा, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, साठवण क्षमता, तसेच कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेशी निगडित इतर प्रश्न हे केवळ ऑपरेशनल नसून कामगारांच्या जीवनमरणाशी संबंधित गंभीर प्रश्न आहेत, ही भूमिका आतापर्यंत फक्त पेट्रोलियम एम्प्लॉयीस युनियन नेच सातत्याने मांडली आहे. या मागण्यांसाठी केवळ निवेदनांपुरते आणि इतरांप्रमाणे **भंपक स्ट्रॉग लेटर** वर मर्यादित न राहता **आमरण उपोषणासारखा** टोकाचा मार्ग अवलंबावा लागला तरी देखील आपण मागे हटलो नाही. त्याचबरोबर वृतवाहिन्या (न्यूज़ मीडिया), पेट्रोलियम मिनिस्ट्री, पेट्रोलियम पार्लमेंटरी कमिटीपर्यंत CMD बद्दल निर्भीडपणे तक्रार करणारी आणि त्यावर पेट्रोलियम मिनिस्ट्री मधून RLC याना या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून अहवाल देण्याकरिता भाग पडणारी देखील फक्त पेट्रोलियम एम्प्लॉयीस युनियनच आहे हे देखील सर्व ज्ञात आहे. केवळ पोकळ लेटर आणि नाटकी आंदोलन हे आपल्या रक्तात नाही आणि आपल्याला जमत नाही आणि जमणार ही नाही.

दिनांक ०१.०७.२०२५ रोजी ओएनजीसी व्यवस्थापन आणि पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन यांच्यात झालेल्या बैठकीत PPE बाबतचा प्रश्न अत्यंत ठामपणे मांडण्यात आला होता. PPE पुरवठ्यातील दीर्घकालीन विलंब, चुकीचे माप, निकृष्ट दर्जा आणि त्यामुळे कर्मचाऱ्यांना असुरक्षित परिस्थितीत काम करावे लागत असल्याचे स्पष्टपणे व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. या प्रश्नावर युनियनचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, आंदोलनात्मक भूमिका आणि आमरण उपोषणामुळे व्यवस्थापनावर दबाव निर्माण झाला आणि त्यातूनच **PPE संदर्भात प्रणाली बदलांची चर्चा होऊन निर्णय झाले.**

# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

दिनांक ०७.०१.२०२६ रोजी सकाळी याच सर्व मुद्द्यांवर कन्सिलेशन पार पडले. या कन्सिलेशनमध्ये PPE नसलेल्या कामगारांकडून काम करून घेता येणार नाही, सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे, तसेच उपलब्ध साठ्यानुसार तातडीने सेफ्टी शूज देण्यात यावेत, अन्यथा PPE नसल्यास आपला कामगार हा कामावर रुजू होणार नाही  ही भूमिका स्पष्टपणे आपल्याकडून नोंदवण्यात आली.

याच कन्सिलेशनमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, फूड बॉक्ससाठी साठवण क्षमतेचा अभाव, SEWAGE TREATMENT PLANT व PRODUCE WATER CONDITIONING SYSTEM सुरू नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याकरिता अस्थापनेने जो घाट घातला आहे त्यामुळे निर्माण झालेल्या आरोग्यविषयक धोक्यांबाबत युनियनने ठाम भूमिका मांडली.

जोपर्यंत STP व PWC पूर्णतः कार्यान्वित होत नाहीत, तोपर्यंत पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड मान्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले तसेच ऑफशोर मध्ये देखील आपण सर्वांना विनंती आहे आपण कोणतीही तडजोड न करता आपल्या कॉन्सिलेशन कॉपी सह OIM आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे सदर दूषित पाणी सर्व प्रणाली चालू झाल्याशिवाय न पिण्याच्या युनियन च्या भूमिकेला पाठिंबा असल्याचे त्वरित कळवावे.

बंधुनो आपल्याला माहितीचा आहे ONGC मधिल पाण्यासारख्या मूलभूत गरजे विरोधातील या तुघलकी फर्मानाला ताबडतोब १ नोव्हेंबर पासून लागू करण्याकरिता आपले बरेच वरिष्ठ आस्थापन उतावळे होते आणि पेट्रोलियम एम्प्लॉयीस युनियन व्यतिरिक्त इतर संघटनांनी मात्र यावर शेपूट घालून गप्प बसणेच स्वीकारले होते त्यामुळे परंतु आपला असलेला तीव्र विरोध आणि सर्वांच्या सहकार्याने पुकारलेले आमरण उपोषण या सर्वांचा परिणाम म्हणजे आज देखील आस्थापन सर्व तयारी करीत आहे परंतु लागू मात्र करीत नाही. ही आपल्या सर्वांच्या एकजुटीचा परिणाम आहे.

पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

या कन्सिलेशननंतर, त्याच दिवशी व्यवस्थापनाने PPE संदर्भातील सर्कुलर जारी केला. हे सर्कुलर कोणत्याही अचानक निर्णयाचा परिणाम नसून, युनियनचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, बैठका, कन्सिलेशनमधील ठाम भूमिका आणि आमरण उपोषणासारख्या आंदोलनात्मक दबावाचा थेट परिणाम आहे, हे प्रत्येकाने स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे.

या सर्कुलरमध्ये व्यवस्थापन समिती (MCoD) च्या निर्णयानुसार ओळखल्या गेलेल्या PPE वस्तूंसाठी Centralized Rate Contract राबवण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. Safety Shoes (Industrial & Electrical) तसेच Overalls (Readymade Cotton व Fire-Retardant) यांचा पुरवठा वैयक्तिक साइज व मोजमापावर आधारित असणार आहे. त्यासाठी SAP आधारित PPE Dashboard विकसित करण्यात आला असून WEBICE प्रणालीत स्वतंत्र node सुरू करण्यात आला आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचे PPE साइज तपशील २३.०१.२०२६ पूर्वी अनिवार्यपणे भरावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच HR, ER आणि PPE Coordinators यांना ही प्रक्रिया वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

युनियन हे ठामपणे सांगू इच्छिते की ही प्रक्रिया स्वागतार्ह असली तरी ती अंतिम समाधान नाही. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले PPE प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांच्या हातात येणे, तेही योग्य मापात, दर्जेदार आणि सुरक्षित स्वरूपात, हेच आपल्या लढ्याचे अंतिम उद्दिष्ट आहे. ऑफशोअर आणि ऑनशोअर दोन्ही ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड मान्य नाही, ही भूमिका युनियनने बैठकींपासून ते कन्सिलेशन आणि आमरण उपोषणापर्यंत प्रत्येक टप्प्यावर स्पष्टपणे मांडली आहे.

बांधवांनो, आलेले सर्कुलर हे नक्कीच आपल्या एकजुटीचा, सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा, आंदोलनात्मक भूमिकेचा आणि संघटित दबावाचा परिणाम आहे. मात्र जोपर्यंत प्रत्येक कर्मचाऱ्याला सुरक्षित PPE, योग्य अन्नपुरवठा आणि सुरक्षित पिण्याचे पाणी प्रत्यक्षात मिळत नाही, तोपर्यंत पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन आपली लढाई थांबवणार नाही.

पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

आपली एकजूटच आपली खरी ताकद आहे, आणि तीच पुढेही परिणाम देत राहील.

पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन,

मान्यताप्राप्त युनियन,

डब्ल्यू. ओ. यु., ओएनजीसी, मुंबई